# दिवसाढवळ्या चेन स्नॅचिंग; एकाच दिवशी चार गुन्हे

## महिलांमध्ये भीतीचे वातावरण



**अमरावती, (दि. 23)** शहरासह जिल्ह्यात चोरी आणि चेन स्नॅचिंगच्या घटनांनी उधाण आले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी काही तासांच्या कालावधीत चार पोलिस ठाण्यांच्या हद्दीत चार महिलांचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावण्याच्या घटना घडल्या. त्याचबरोबर घरफोड्या आणि मोबाइल चोरीच्या सातत्यपूर्ण प्रकरणांमुळे चोरांचे मनोबल दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी स्पष्ट दिसत असले, तरी अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही.

### दोन तासांत चार चेन स्नॅचिंग

फ्रेजरपुरा परिसरातील मोती नगर येथील महिला ब्यूटी पार्लरवरून घरी परतताना गल्लीत दोन दुचाकीस्वारांनी अचानक धक्का देत 12 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (किंमत 45 हजार) हिसकावून पलायन केले. दुसरी घटना बडनेरा परिसरात घडली. दत्त मंदिराकडे जात असलेल्या महिलेकडून 20-25 वयोगटातील दोघांनी 8 ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र (किंमत 30 हजार) ओढून नेले. तिसरी घटना राजापेठ ठाण्याच्या हद्दीत कृष्णार्पण कॉलनी पुलाजवळ घडली. जागृती महिला मंडळातील सदस्या असलेल्या महिलेकडून 25 ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र (किंमत सुमारे 3 लाख) हिसकावण्यात आले. तिन्ही घटनांवर फ्रेजरपुरा, बडनेरा आणि राजापेठ पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सावनेर ते माहुली चोरदरम्यान प्रभा दिलीप भातकुलकर (51, रा. सावनेर, नांदगाव खंडेश्वर) यांच्या गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवर आलेल्या तरुणांनी हिसकून पळ काढला. या घटनेची तक्रार नांदगाव खंडेश्वर ठाण्यात करण्यात आली आहे.

# अपक्ष उमेदवारांचा चिन्हाविनाच प्रचार

- अपिलातील अर्जाच्या माघारीची 25 पर्यंत मुदत
- 4 दिवस मिळणार उमेदवाराला प्रचारासाठी



महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, (दि.23)**- नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतच्या उमेदवारांना तब्बल सहा निवडणुकीमध्ये इच्छुक दिवसच निवडणूक चिन्हाविना प्रचार करावा लागणार आहे. वैध अवैध ठरलेल्या अर्जावरील अपिलाचा निकाल 25 नोव्हेंबर रोजी लागणार आहे. त्यानंतर 26 नोव्हेंबर रोजी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यामुळे अपक्ष असलेल्या उमेदवारांना 26 नोव्हेंबर रोजी चिन्ह मिळणार असून, त्यानंतर चिन्हासह प्रचार करण्यासाठी केवळ चार दिवस मिळणार आहेत. नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू आहे. उमेदवारांचे अर्ज पात्र आणि अपात्र ठरल्यानंतर 21 नोव्हेंबर ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख होती. आणखी किती उमेदवार अर्ज मागे घेतील, हे पाहणे उत्सुकतेचे राहणार आहे. उमेदवारी अर्ज माघारी अपिलातील घेतल्यानंतर अर्जावर निकाल लागेपर्यंत अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. 26 नोव्हेंबर रोजी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यानंतर 30 नोव्हेंबर रोजी प्रचार संपणार आहे. त्यामुळे केवळ चार दिवसांमध्ये अपक्ष उमेदवारांना प्रचार करावा लागणार आहे.

### पहिल्यांदाच असा निर्णय

कोणत्याही निवडणुकीत माघारीच्या दिवशीच चिन्हांचे वाटप केले जाते. त्या दिवसापासून प्रचार साहित्यावर चिन्हांची मोहोर उमटवली जाते. पण पहिल्यांदाच एवढा मोठा गॅप असून, माघारीनंतरचे सहा दिवस अपक्षांना फक्त आपल्या नावाचा प्रचार करावा लागणार आहे. अपिलात दाखल केलेल्या दाव्यांचा निकाल 25 नोव्हेंबर रोजी लागणार आहे. 2 या दिवसापर्यंत माघारीची अंतिम मुदत असल्याने 26 तारखेला अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप केले जाईल, असे निवडणूक विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले.

### पक्ष, आघाडीस अडचण नाही

जो उमेदवार पक्षाकडून किंवा आघाड्यांकडून निवडणूक लढवत आहेत, त्यांचे निवडणूक चिन्ह निश्चित आहे. त्यामुळे माघारीची प्रक्रिया संपल्यानंतर ते चिन्हासह प्रचार करू शकतात.

### चिन्हावर प्रचार फक्त चार दिवस

अपक्षांच्या चिन्हांचे वाटप 26 नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे 27 ते 30 नोव्हेंबरपर्यंत म्हणजे फक्त चार दिवस चिन्हावर प्रचार करता येणार आहे. मंगळवार, 2 डिसेंबर रोजी निवडणुकीचे मतदान होणार आहे.

# 16 चाकी ट्रकमधून गोवंश तस्करी उघड

### 52 जनावरे सुटली, अंधारात चालक पसार

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर (दि. 23)** - स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत 16 चाकी अशोक लेलॅन्ड ट्रकमधून कत्तलीसाठी नेली जात असलेली 52 गोवंशीय जनावरे जप्त केली. ही कारवाई 23 नोव्हेंबर रोजी उशीरा रात्री करण्यात आली. मात्र चालक आणि क्लीनर अंधाराचा फायदा घेत पसार झाले.



पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी अमरावती ग्रामीण हद्दीत गोवंश तस्करी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पो.उप.नि. विशाल रोकडे आणि त्यांचे पथक नांदगाव खंडेश्वर परिसरात गस्त घालत असताना गुप्त माहिती मिळाली की एमएच 27 बीएक्स 7983 क्रमांकाचा ट्रक जनावरे निर्दयपणे बांधून अमरावतीकडे कत्तलीसाठी नेला जात आहे. त्यावर पथकाने घानोरा-गुरव परिसरात नाकाबंदी केली. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा इशारा केला असता चालक आणि क्लीनर ट्रक रस्त्याच्या कडेला सोडून पळाले. शोध घेतला मात्र ते हात लागले नाहीत. ट्रकमध्ये 52 गोवंश बांधून भरलेली आढळली. जनावरांची किंमत 4 लाख 87 हजार तर ट्रकची किंमत 10 लाख रुपये, असा एकूण 14 लाख 87 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ट्रक आणि जनावरे नांदगाव खंडेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखेडे आणि ठाणेदार श्रीराम लांबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विशाल रोकडे, अशिक शेख, पोहवा संतोष तेलंग, दिपक पाल, राजेश कासोटे, दिपक पाटील, शुभम थोरात व चालक किशोर सुने यांनी संयुक्तपणे केली.

# मतदार यादींवर आक्षेपाची मालिका सुरुच

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.23)** - महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रारूप मतदारयादीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस आला आहे. जवळपास वीस हजारांहून अधिक मतदारांची नावे दोन वेगवेगळ्या प्रभागांत नोंदविल्याचे समोर आले असून, निवडणूक आयोगाने अशा नोंदींसमोर दोन स्टार लावून त्यांना संशयित यादीत ठेवले आहे. मृत, स्थलांतरित आणि अपूर्ण नोंदी मोठ्या प्रमाणात असल्याने मतदारसंख्या कृत्रिमरीत्या वाढल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. यादी जाहीर होताच आक्षेपांच्या अर्जांची मालिका सुरू झाली आहे.

मनपाच्या प्रारूप मतदारयादीत 6 लाख 77 हजार 167 मतदारांची नोंद असून, दोन वेळा मुदतवाढ मिळाल्यानंतर ती 20 नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आली. आक्षेप नोंदविण्यासाठी 27 नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली असून, केवळ दोन दिवसांत 30 नागरिकांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. यामध्ये प्रभाग बदलून देण्याच्या मागण्या मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. यादीतील चुकीची नावे, अपूर्ण माहिती, जन्मतारीख बदल, इंग्रजी स्पेलिंगमधील त्रुटी यामुळे अनेकांना तक्रारी नोंदवाव्या लागत आहेत.

### वीस हजारांहून अधिक मतदारांची दूबार नावे



माजी नगरसेवक विजय वानखडे यांच्या पत्नी प्रतिभा वानखडे यांनी सर्वप्रथम इंग्रजी नावातील चूक दाखवली. आशिष भोजने, दिलीप पानझाडे, राहुल आगळे, दिलीप पांडे, विक्रांत देशमुख, प्रमोद ठाकरे यांच्यासह अनेकांनी प्रभाग 19 मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज दाखल केले. काही प्रभागांत तर एकाच वेळी दहाङ्कपंधरा जणांनी बदलाची मागणी केल्याचे दिसून आले. जितेंद्र वाघ यांनी तर गडगडेश्वर प्रभागातील 34 मतदारांची नावे समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. या सर्वांमध्ये सर्वात गंभीर बाब म्हणजे वीस हजारांहून अधिक मतदारांची दुबार नोंद. एका मतदाराचे नाव दोन प्रभागांत आढळल्याने यादीची विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात ढळली आहे. मृत व स्थलांतरित व्यक्तींची नावे कायम असल्याने एकंदर मतदारसंख्या फुगवट्याची झाली आहे. त्यामुळे निवडणूक व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# अतुल पुरी हत्या प्रकरणातील मास्टरमाईन्ड अक्षय शिंपी मुंबईत अटक

### अमरावती गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 23)** बडनेरा हद्दीतील तिलकनगर रोड परिसरात झालेल्या अतुल पुरी हत्या प्रकरणातील तिन महिन्यांपासून फरार असलेला मुख्य आरोपी अक्षय प्रदीप शिंपीला अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने चेंबूर, मुंबई येथून अटक करण्यात यश मिळवले आहे. गुन्हे शाखेच्या सततच्या पाठपुराव्यानंतर आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीला जेरबंद करण्यात आले.

माहितीनुसार, 22 ऑगस्ट रोजी सकाळी सुमारास 9 वाजता पुंडलीकबाबा नगर, अमर कॉलनी येथील अतुल ज्ञानदेव पुरी हे बडनेरा रेल्वे स्टेशनकडे जात असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करून त्यांची हत्या केली होती. या याप्रकरणता बडनेरा पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविला. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सुरू होता. आतापर्यंत या प्रकरणात पाच आरोपी आणि तीन विधी संघर्षित बालकांना अटक करून गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे. मात्र आरोपी अक्षय शिंपी (वय 30, रा. गणेडीवाल लेआउट, कॅम्प, अमरावती) गुन्हा घडल्यानंतर सतत फरार होता. अमरावती गुन्हे शाखेचे पथक त्याच्या मागावर होते आणि त्याबाबत गोपनीय माहिती गोळा करत होते. 22 नोव्हेंबर 2025 रोजी गुप्त माहिती मिळाली की आरोपी शिंपी मुंबईतील चेंबूर परिसरात लपून बसला आहे. त्यावर तात्काळ कारवाई करत निरीक्षक संदीप चव्हाण यांनी सपोनि महेश इंगोले व पथकाला मुंबईत रवाना केले. चेंबूर परिसरात अत्यंत शिताफीने सापळा रचून पथकाने आरोपीला ताब्यात घेण्यात यश मिळवले. पुढील तपासासाठी त्याला बडनेरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### या पथकाची कामगिरी

ही कारवाई मा. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ आणि एसीपी शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस कर्मचारी गजानन ढेवले, मंगेश परिमल, मनोज ठोसर, आरतीक देशमुख, संग्राम भोजने, योगेश पवार, संदीप खंडारे व प्रभात पोकळे यांनी केली.

# धामणगाववासियांना हवा 'विकासाचा व्हिजन' असणारा लोकसेवक

- उमेदवार निवडून येतात आणि पाच वर्षे होतात गायब
- धामणगाव रेल्वेच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी कोण घेणार?

महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, (दि.23)** - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येताच उमेदवारांचे जाहीरनामे आणि आश्वासनांची लगबग वाढली आहे.

मात्र धामणगाव रेल्वे शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, नालेव्यवस्था, आरोग्य सुविधा आणि पायाभूत कामांची गती—या अनेक मुद्द्यांवर नागरिकांमध्ये नाराजी कायम आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत मतदार स्पष्ट व्हिजन असलेला, सातत्याने उपलब्ध राहणारा आणि जबाबदार लोकसेवक शोधत आहेत.



### शहर छोटे, पण व्हिजन मोठे!

आश्वासने नकोत, काम करणारे नेतृत्व हवे, शहराचा विकास म्हणजे केवळ रस्ते किंवा स्ट्रीटलाइट नव्हे, तर शिक्षण, आरोग्यसेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रोजगारनिर्मिती आणि सक्षम प्रशासन या सर्व गोष्टींना तितकेच महत्त्व आहे, असे नागरिकांचे ठाम मत आहे.

धामणगाव रेल्वेचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी मिटवणे हेच माझे प्राधान्य आहे. पंधरा वर्षांपासूनच्या सरकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचत आहे आणि तो सातत्याने मिळत राहावा, हे माझे ध्येय आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता आणि महिला सुरक्षिततेसाठी मी तातडीने काम करणार आहे.

**अर्चना अडसड (रोठे), भाजप उमेदवार.**



शहरातील अनेक समस्या अद्यापही सुटलेल्या नाहीत. दाखवलेला विकास कागदावरच राहिला आहे. पारदर्शक प्रशासन, मूलभूत गरजांचा पुरवठा आणि लोकांच्या हक्कांसाठी लढा देणे ही माझी प्राथमिकता आहे.

**वर्षा देशमुख, काँग्रेस उमेदवार.**



### धामणगाव रेल्वे नगरपरिषदेत भ्रष्टाचाराचे आरोप

धामणगाव रेल्वे नगरपरिषदेत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची चर्चा स्थानिक पातळीवर जोरात आहे. काही सुजाण नागरिकांच्या हाती कागदपत्रे आणि संभाव्य पुरावे मिळाल्याचा दावा केला जात असून, ही माहिती हायकोर्टापर्यंत नेण्याची तयारी सुरू असल्याचीही चर्चा आहे. निवडणुकीच्या तोंडावर या घडामोडींमुळे नगरपरिषदेतील अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदार अडचणीत येऊन तुरुंगात जाऊ शकतात, अशीही चर्चा शहरात रंगत आहे.

# माजी पदाधिकाऱ्यांमुळे उमेदवारांवर नाराजीचे सावट

### चांदूर बाजार नगर परिषद निवडणूक

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, (दि.23)** -चांदूर बाजार नगर परिषद निवडणुकीचा तापलेला राजकीय वातावरण दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत आहे. विविध पक्षांनी उमेदवारांची नावे जाहीर केली असली, तरीही मतदारांमध्ये माजी नगरसेवक व माजी पदाधिकाऱ्यांविषयी प्रखर नाराजी असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. हीच नाराजी सध्याच्या उमेदवारांवर सावट बनून पडत असून, त्यांच्या प्रचारात मोठी अडचण निर्माण होत आहे.

मागील कार्यकाळात नगर परिषदेच्या काही महत्त्वाच्या कामांचा वेग मंदावला होता. वस्तीमधील देशी दारू दुकानाचा वाद, कचरा व्यवस्थापन प्रकल्पातील अनियमितता, कर्मचाऱ्यांची दादागिरी, शासकीय कामकाजातील राजकीय हस्तक्षेप, तसेच पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता अशा मूलभूत सुविधांकडे झालेले दुर्लक्ष— या सर्व गोष्टींमुळे जनतेत नाराजी वाढली होती. शिवाय गटबाजी, आंतरकलह आणि माजी नगरसेवकांनी घेतलेल्या वादग्रस्त भूमिकांमुळे विकासकामे रखडल्याची भावना नागरिकांमध्ये प्रबळ आहे.

याच कारणामुळे यावेळी नवीन चेहऱ्यांना संधी द्यावीअशी मागणी अनेक भागातून जोर धरत होती. परंतु अनेक संभाव्य उमेदवार हे पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांच्या गोटाशी संबंधित असल्याने मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जुने चेहरेच पुढे येणार का?, गटकारभार पुन्हा तसाच राहणार का? असे थेट प्रश्न नागरिक उमेदवारांना विचारित आहेत. दरम्यान, काही उमेदवारांना प्रचारादरम्यान नाराजीचा प्रत्यक्ष सामना करावा लागल्याचे प्रकारही घडले आहेत. दुसरीकडे, स्वच्छ प्रतिमा आणि काम करण्याची क्षमता असलेल्या नव्या उमेदवारांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, घरभेटी आणि लहान सभा या माध्यमातून ते जनसंपर्क वाढवत आहेत.




### मतदारांचा कल कुणाकडे?

पाणीपुरवठा, रस्ते, गटार, स्वच्छता आणि बाजारपेठेचा विकास हे प्रमुख मुद्दे या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहेत. मागील कार्यकाळातील अपूर्ण प्रलंबित कामे मतदारांच्या स्मरणातून अजूनही पुसलेली नाहीत. एकूणच, चांदूर बाजारमध्ये यावेळी बदलाची भावना प्रबळ दिसत असून, माजी पदाधिकाऱ्यांच्या सावलीत उभ्या असलेल्या उमेदवारांसमोर कठीण आव्हान आहे. अखेर मतदार कोणावर विश्वास ठेवतात, हे निकालातच स्पष्ट होणार आहे.

# निवडणुकीत स्टार्च कपड्यांची चलती

## पांढऱ्या खादीच्या कपड्यांना मागणी वाढली

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट, (दि.23)**- राजकीय नेत्यांना खादीच्या कपड्यांची विशेष आवड असते. त्यामुळे आजही अनेक नेते खादीचा कुर्ता-पायजमा परिधान करताना दिसतात. आगामी महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खादीच्या कपड्यांची बाजारात मागणी वाढताना दिसत आहे.

### बाजारातही निवडणुकीची धामधूम

दिवाळीनंतरही कपड्यांची खरेदी सुरूच असून बाजारात मोठी गर्दी दिसत आहे. उमेदवार आणि कार्यकर्त्यांना कपडे कडक हवेत, अशी मागणी व्यापाऱ्यांकडे होत आहे. कपड्यांना सध्या विशेष पसंती खादीसह इतर हलक्या रंगांच्या मिळत आहे.



### जॅकेटचा वाढता ट्रेंड

काही नेते पांढऱ्या शर्टावर जॅकेट परिधान करण्याचा ट्रेंड अवलंबत आहेत. पांढऱ्यासोबत हलक्या रंगांचे कपडेही ग्राहक पसंत करत आहेत. लोकांसमोर आकर्षक दिसावे, यासाठी उमेदवार आणि कार्यकर्ते पोशाखाची काळजी घेत असल्याचे बाजारात पाहायला मिळत आहे.

### प्रचार मोहीम आणि पांढऱ्या कपड्यांची धडपड

सध्या सर्वत्र निवडणुकीची धामधूम सुरू आहे. उमेदवार आणि कार्यकर्ते कडक, शुभ्र आणि स्टार्च केलेल्या पांढऱ्या कपड्यांची निवड करत आहेत. स्वच्छ आणि नीटनेटके कपडे व्यक्तिमत्त्व उठावदार दाखवतात, त्यामुळे उमेदवार स्वतःच्या पोशाखाकडे विशेष लक्ष देत आहेत. गाठीभेटी, सभा आणि दौऱ्यांदरम्यान पांढरा कुरकुरीत कुर्ता-पायजमा किंवा पांढरा शर्ट परिधान करून ते मतदारांवर चांगली छाप पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे लाँड्री आणि कपड्यांच्या दुकानांवर वाढीव कामाचा ताण जाणवत आहे.

### मतदारांवर छाप पाडण्याची स्पर्धा

पांढरे कपडे स्वच्छता आणि साधेपणाचे प्रतीक आहे, उमेदवारांना पोशाखातून व्यक्तिमत्त्व उठावदार दाखवायचे प्रयत्न असते, या निवडणूकीमध्ये खादी, कुर्ता-पायजमा आणि जॅकेटचा वापर वाढला आहे.एकूणच, निवडणुकीच्या काळात प्रचाराबरोबरच पांढऱ्या खादीच्या कपड्यांची मोठी चलती दिसत आहे. स्वच्छ, कडक आणि स्टार्च केलेले कपडे परिधान करून नेते व कार्यकर्ते मतदारांवर प्रभाव पडावा यासाठी प्रयत्नशील आहेत.

# गुराख्यावर चार अस्वलींचा हल्ला, मदतीला धावल्या गायी

### कुहीगाव येथील घटना

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि.23)** - चिखलदरा तालुक्यातील कुहीगाव येथे गुरे चारण्यासाठी शेतालगत गेलेल्या हतरु मुंगीलाल सानू सेलूकर (वय 65) नामक गुराख्यावर दोन लहान आणि दोन मोठ्या अश्या चार अस्वलांनी अचानक हल्ला केला. रविवारी सकाळच्या सुमारास हा प्रकार घडला. या हल्ल्यात त्यांच्या चेहऱ्यावर, जबड्यावर, पोटावर तसेच पायावर गंभीर जखमा केल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतात गायी चारत असताना अचानक अस्वलांचा कळप हतरु सेलूकर यांच्यावर धावून आला. यात त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला मात्र परिस्थिती बिकट झाली होती. त्याच वेळी जवळ असलेल्या गायी थेट अस्वलींच्या अंगावर धावून गेल्या. त्यामूळे अस्वल दुसरीकडे निघून गेल्या. त्यामुळे सेलूकर यांचा जीव थोडक्यात बचावला. घटनेची माहिती होताच गावकऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्यांना हतरु प्राथमिक उपचार केंद्रात नेले, मात्र तेथे योग्य उपचार न मिळाल्याने त्यांना चुरणी येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

डॉक्टरांनी त्यांच्या जखमांवर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा रुग्णालयात रेफर करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय पथक लक्ष ठेवून आहे.



### वनविभागाकडून पाठ

घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाचे काही कर्मचारी हतरु आरोग्य केंद्रात पोहोचले, मात्र नंतर त्यांनी जखमी सेलूकर कडे पाठ फिरवली. या प्रकारामूळे गावकऱ्यांमध्ये वनविभागाविरुध्द प्रचंड नाराजी आहे.

# चिथावणीखोर पोस्ट टाकल्यास थेट कारवाई

## निवडणूक काळात समाज माध्यमांवर पोलिसांची नजर



### मॅसेज 'फॉरवर्ड' करण्यापूर्वी सत्यता तपासा

शहर पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियाचा वापर करताना विशेष दक्षता बाळगण्याचे आवाहन केले आहे.तोंडी इशारे किंवा नोटीस देण्यापेक्षा थेट गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे. जातीय तेढ वाढवणाऱ्या आणि शांतता बिघडवणाऱ्या किंवा निवडणूक प्रक्रियेला बाधा आणणाऱ्या कोणत्याही पोस्टला अजिबात सवलत दिली जाणार नाही,असेही पोलिसांनी सांगितले. माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार अशा गुन्ह्यांना दंडासह कारावासाची तरतूद असून,अफवा किंवा उत्तेजित करणारी माहिती पसरवणे गंभीर गुन्हा मानला जातो. त्यामुळे नागरिकांनी 'फॉरवर्ड' बटण दाबण्यापूर्वी माहितीची सत्यता नीट तपासण्याचा सल्ला पोलिसांनी दिला आहे.

सोशल मीडियावर आक्षेपार्ह, दिशाभूल करणारी किंवा जातीय-धार्मिक तेढ निर्माण करणारी माहिती प्रसारित करणाऱ्याविरुद्ध तत्काळ गुन्हा नोंदवण्यात येईल.कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी सत्यता तपासा आणि शांतता भंग होईल असे वर्तन टाळा.

**श्रीराम लांबडे,**
**ठाणेदार, नांदगाव खंडेश्वर.**

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, (दि.23 )-** नगर पंचायत निवडणुका जवळ आल्याने नांदगाव खंडेश्वर शहर पोलिसांनी सोशल मीडियावर कठोर पाळत ठेवण्यास सुरुवात केली आहे. समाजात तणाव निर्माण होऊ नये आणि निवडणुकीचे वातावरण दूषित होऊ नये म्हणून आक्षेपार्ह, चिथावणीखोर किंवा अफवा पसरवणाऱ्या पोस्टवर तातडीने कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# डोंगराळे घटनेतील नराधमाला फाशीची द्या!

## बजरंग दलाचे तहसीलदारांना निवेदन



महासागर | प्रतिनिधी

**वरुड ( दि. 23 ) -** मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षांच्या चिमुकली यज्ञावर बलात्कार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या अमानुष घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. या भीषण प्रकरणाच्या निषेधार्थ वरुड शहरातील बजरंग दल कार्यकर्त्यांनी गुरुवार, दि. 20 रोजी तहसील कार्यालय आणि पोलीस स्टेशन, वरुड येथे धडक देत आरोपीला तत्काळ फाशीची शिक्षा देण्याची तीव्र मागणी निवेदनाद्वारे केली.

या वेळी बजरंग दलाचे जिल्हा संयोजक विक्रम काळे म्हणाले की, अशा नराधमांना समाजात स्थान नाही. निरपराध बालिकेवर अत्याचार करणाऱ्याला तात्काळ फाशीची शिक्षा झालीच पाहिजे. प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणी होऊन न्याय विलंबित होता कामा नये. त्यांनी अशा गुन्ह्यांना रोखण्यासाठी कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही केली. कार्यकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात यज्ञाच्या कुटुंबीयांना शासनाकडून त्वरीत व पर्याप्त मदत मिळावी, तसेच भविष्यात अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर सुरक्षा यंत्रणा उभारावी, अशी मागणी करण्यात आली. तहसीलदार कार्यालय व पोलीस स्टेशन दोन्ही ठिकाणी शिष्टमंडळाने निवेदन देऊन आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याचा आग्रह धरला.



# स्काऊट-गाईड राष्ट्रीय मेळाव्यासाठी अमरावतीचे शिबिरार्थी रवाना

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 23 ) :** लखनऊ येथे 23 ते 29 नोव्हेंबरदरम्यान होत असलेल्या एकोणिसाव्या डायमंड ज्युबिली स्काऊटङ्गाईड राष्ट्रीय जांबोरीसाठी अमरावती जिल्ह्यातील 32 स्काऊटङ्गाईड विद्यार्थी रवाना झाले. तब्बल 61 वर्षांनी होत असलेल्या या भव्य मेळाव्यात देशभरातील 30 हजार व विदेशातील 2 हजार स्काऊटङ्गाईड सहभागी होत आहेत. उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी तर समारोप राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे.

अमरावतीतील श्री रामबिलास मुंधडा हायस्कूल उदखेड, साईबाबा विद्यालय अमरावती आणि होलिक्रॉस कॉन्व्हेंट स्कूल या शाळांची निवड करण्यात आली असून अधिकारी सतीश मुगल, प्रिया देशमुख, प्रीती गोल्हर, सुभाष आठवले यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या.

मेळाव्यात कॅम्प फायर, स्टेट एक्झिबिशन, मार्चपास्ट, लोकनृत्य आदी विविध उपक्रमांमध्ये अमरावतीला मार्चपास्ट संचालनाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# वरुड नगर परिषदेत भाजपातील गटबाजी शिगेला

## महाविकास-राष्ट्रवादीची चुरस वाढली





**वार्तापत्र**
विलास पाटील,
वरुड
भ्रमणध्वनी-9422155507

वरुड नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असून भाजपामधील नाराजी शिगेला पोहोचली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते ईश्वर सलामे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पक्षातील अनेक इच्छुकांनी उघडपणे असंतोष व्यक्त केला आहे.

यात अधिक अडचणीचे म्हणजे—भाजपाचे शहर नेते व नगरसेवक पदासाठी प्रयत्नशील असलेल्या डॉ. निलेश बेलसरे यांच्या सुनबाईंनी अचानक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून नगराध्यक्षपदाची उमेदवारी स्वीकारली आहे. या घडामोडीने निवडणूक अनपेक्षित वळणावर गेली असून भाजपातील अंतर्गत मतभेद किती तीव्र आहेत, याचे स्पष्ट चित्र यातून दिसत आहे. दरम्यान, बजरंग दलातील एका कार्यकर्त्याला उमेदवारी न दिल्याने संघटनेतही मोठा संताप व्यक्त होत आहे. बजरंग दलाचे काही कार्यकर्ते भाजपच्या अधिकृत उमेदवाराविरोधात प्रभागनिहाय फिरत असल्याची चर्चा असून त्यामुळे राजकीय वातावरण आणखी ताणले गेले आहे. या नाराजीचा फायदा विरोधी उमेदवारांना होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीने माजी शिक्षण सभापती प्रशांत धुर्वे यांच्यावर विश्वास दाखवत नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर केली आहे. स्थानिक पातळीवरील त्यांची मजबूत ओळख, शिक्षण क्षेत्रातील कामगिरी आणि संघटनेतील बळ पाहता त्यांच्या दावेदारीला तिन्ही उमेदवारांमध्ये सर्वाधिक प्रबळ मानले जात आहे. भाजपात डॉ. अनिल बोंडे गट व विक्रम ठाकरे गट यांना उमेदवारी प्रक्रियेत दुय्यम स्थान मिळाल्याची माहिती असून त्यातून निर्माण झालेली नाराजी आता उघडपणे दिसू लागली आहे. या गटबाजीचा फटका भाजपाच्या अधिकृत उमेदवाराला मोठ्या प्रमाणात बसू शकतो, असे जाणकारांचे मत आहे. एकूणच, वरुड नगराध्यक्षांची निवडणूक अत्यंत चुरशीची बनली असून भाजपातील विसंवादामुळे ही लढत अधिकच अनिश्चित आणि रोमांचक झाली आहे.

## घरात शिरून मोबाइल व मंगळसुत्राची चोरी

**अमरावती -** खोलापुरीगेट पोलिस ठाणे हद्दीत येणाऱ्या साबनपुरा परिसरात भरदिवसा घरात शिरून मोबाइल आणि सोनेचे मंगळसूत्र चोरी करण्याची घटना 22 नोव्हेंबर रोजी सकाळी 8.40 वाजता घडली. घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात आरोपी युवतीचे स्पष्ट चित्र कैद झाले आहे. याप्रकरणी सैय्यद जफर सैय्यद नजीमोद्दीन (38) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात युवतीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सैय्यद जफर नेहमीप्रमाणे सकाळी झोपेतून उठले आणि त्यांनी आपला मोबाइल ठेवलेल्या जागी पाहिले, मात्र मोबाइल दिसला नाही. त्यानंतर त्यांच्या आईने टेबलवर ठेवलेले सोनेचे मंगळसूत्रही गायब झाल्याचे निदर्शनास आले. चोरीची शंका आल्याने घरात बसवलेल्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता गुलाबी जॅकेट परिधान केलेली एक तरुणी घरात प्रवेश करून जाताना हातात मोबाइल घेऊन जाताना दिसत होती.



# नशिरपूर येथे श्रमदानातून वनराई बंधाऱ्याचे निर्माण

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी( दि.23 ) -** तालुक्यातील नशिरपूर येथे 22 नोव्हेंबर रोजी पंचायत समिती अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्या सहभागातून श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीत दररोज विविध उपक्रम राबविले जात असून, त्याचाच्या पुढील टप्प्यात पश्चिमेकडील नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले. या उपक्रमात गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रीती खटिंग, सरपंच तुषार गावंडे, उपसरपंच कविता बोटरे, पोलीस पाटील, शिक्षक, ग्रामपंचायत अधिकारी माधुरी देवघरे, ग्रामरोजगार सेवक, आशा सेविका, उमेद कर्मचारी तसेच विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून बंधाऱ्याचे काम यशस्वीपणे पूर्ण झाले.

# राजुरा मध्ये एनडीआरएफचे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

महासागर | प्रतिनिधी



**चांदूर रेल्वे( दि.23 ) -** तालुक्यातील राजुरा येथील स्व. खंडेराव देशमुख कनिष्ठ माध्यमिक विद्यालयात मंगळवार (ता. 18) रोजी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी तसेच गावातील युवक-युवतींसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणाचे प्रमुख मार्गदर्शक ब्रिजेश कुमार यादव (इन्स्पेक्टर जे.डी.) होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एनडीआरएफच्या 13 सदस्यांच्या टीमने विविध आपत्ती काळातील बचावकार्य, प्राथमिक उपचार, सुरक्षितता उपाययोजना यासंबंधी महत्त्वपूर्ण प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमात महेश भावसर, प्रशांत वाघमारे, अशोक निंबर्टे, सुरज प्रकाश मिश्रा, गजानन वाडेकर, निलेश रेले, वर्षा भगत, विनोद कुमार जेडे, आवेज अली, परसराम साहू, देवेंद्र कुमार, प्रतीक कडू आणि मंगेश बोरकर उपस्थित होते. टीमचे स्वागत व सत्कार स्व. खंडेराव देशमुख कनिष्ठ माध्यमिक विद्यालय, राजुरा चे प्राचार्य कापसे तसेच शिक्षकवृंद नितीन टाले, नंदकुमार कापडे, बोरकर, पाटेकर, खंडारे, सोळंके, भास्कर, तुमडाम, हिवरे, अभ्यंकर, शिरभाते, गणगणे, चाफले, जगनाडे, राजेंद्र हेटे, मानवटकर, पर्तींगे आणि बेलसरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. आपत्तीच्या प्रसंगी स्वतऱ्ची व इतरांची सुरक्षितता कशी करावी, तात्काळ मदत कशी द्यावी, तसेच धोकादायक परिस्थितीत योग्य निर्णय कसे घ्यावेत याबाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिके सत्रात देण्यात आली. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक राजुरा ग्रामपंचायत सदस्य भुषण शिवदासराव काळे होते. त्यांच्या पुढाकाराने हा उपयुक्त व सामाजिक जाणीव वाढवणारा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# जसापूर येथे श्री संत गजानन महाराज प्राणप्रतिष्ठा महोत्सव

## आजपासून धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

महासागर | प्रतिनिधी



**चांदूर बाजार,( दि.23 )-** तालुक्यातील जसापूर येथे नव्याने उभारलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिरात 24 ते 27 नोव्हेंबर 2025 या कालावधीत प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या चार दिवसांच्या महोत्सवात मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशरोहण, विठ्ठलङ्गरुख्मिणी आणि श्री गणेश मूर्ती स्थापना यांसह विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ग्रामस्थांनी भाविकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

24 नोव्हेंबरला उत्सवाची सुरुवात काकडा आरतीने होणार आहे. त्यानंतर ग्रामस्वच्छता उपक्रम, स्व. नारायणराव बंड सभागृह उद्घाटन, मान्यवरांचा सत्कार, गाव प्रदक्षिणा आणि हरिपाठ यांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी भव्य दिंडी सोहळा पार पडणार असून हरिनाम संकीर्तन, टाळङ्गमृदंग व पालखीच्या निनादाने गाव भक्तिरसात रंगणार आहे. 25 नोव्हेंबरला कलशरोहणाचा महत्त्वपूर्ण विधी पार पडेल. विजय ग्रंथाचे पारायण, प्रवचन कार्यक्रम आणि महिलांच्या सहभागातून कलश यात्रा काढण्यात येईल. वेदघोष आणि मंत्रोच्चारामुळे वातावरण अधिक पवित्र होणार आहे. 26 नोव्हेंबरला श्री संत गजानन महाराज मूर्ती पूजन, होम विधी आणि प्राणप्रतिष्ठेपूर्वक धार्मिक कार्यक्रम होतील. या दिवशी विशेष महाप्रसादाचे आयोजन होणार आहे.

27 नोव्हेंबर हा महोत्सवाचा शेवटचा दिवस असून सकाळी गोपाळ मुहूर्तावर प्राणप्रतिष्ठा विधी संपन्न होईल. त्याच दिवशी ग्रामस्वच्छता अभियान राबवून सामाजिक बांधिलकीही जपली जाणार आहे. या चार दिवसांच्या महोत्सवामुळे जसापूरमध्ये भक्ती, एकोपा आणि आध्यात्मिकतेचे वातावरण अधिक उजळून निघेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## मुलाने केला वडिलांवर हल्ला

**अमरावती -** खोलापूर पोलीस ठाणे हद्दीतील टाकरखेडा कावरे येथे मुलाने वडिलांवर हल्ला केल्याची घटना शनिवारी पुढे आली. संजय जगदेवराव इंगळे (50) यांनी त्यांचा मुलगा अनूपला शिक्षणाकडे लक्ष देण्यासोबतच काही कामधंदा करण्याचा सल्ला दिला. याचा राग आल्याने अनूपने वडिलांवर विळ्याने हल्ला केला. या हल्ल्यात संजय जखमी झाले असून, त्यांच्या तक्रारीवरून पोलीसांनी अनूप इंगलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्हा परिषदेत ओबीसी सदस्यसंख्या घटण्याची शक्यता

## 50 टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणावरील सुनावणीमुळे राजकीय वातावरण तापले

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती,( दि.23 ) -** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांमध्ये प्रचंड हालचाल सुरू आहे. मात्र 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाबाबत दाखल केलेल्या याचिकेवर येत्या मंगळवारी (25 नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीमुळे अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाचा जिल्हा परिषद आरक्षणावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

राजकीय जाणकारांच्या माहितीनुसार, सध्या अमरावती जिल्हा परिषदेत ओबीसी प्रवर्गासाठी 15 जागा आरक्षित आहेत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने 50 टक्क्यांहून अधिक आरक्षण न देण्याचा निर्णय दिल्यास ओबीसी आरक्षणातील अंदाजे 9 जागा कमी होऊ शकतात. अशा परिस्थितीत फक्त तीनच जागा ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षित राहतील. त्याचप्रमाणे अचलपूर, वरुड आणि दर्यापूर पंचायत समित्यांमध्येही ओबीसी प्रवर्गातील प्रत्येकी एक जागा घटण्याची शक्यता आहे. सभापती पदाच्या आरक्षणातही ओबीसी प्रवर्गाच्या तीन जागा कमी होऊ शकतात.

### या ठिकाणी होवू शकतात जागा कमी

- अचलपूर पंचायत समितीमध्ये 12 सदस्य असून त्यापैकी एससी-एसटीसाठी प्रत्येकी 2, ओबीसीसाठी 1 आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी 5 जागा आहेत. 50 टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण झाल्याने ओबीसीची एक जागा कमी करून ती सर्वसाधारण प्रवर्गात जोडावी लागेल.
- वरुड पंचायत समिती मध्ये 10 सदस्य असून एससी-एसटी-ओबीसीसाठी प्रत्येकी 2 आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी 4 जागा आहेत. येथेही ओबीसी प्रवर्गातील एक जागा कमी होण्याची शक्यता आहे.
- दर्यापूर पंचायत समितीमध्ये 8 सदस्य असून एससीसाठी 2, एसटीसाठी 1, ओबीसीसाठी 2 आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी 3 जागा आहेत. इथेही ओबीसीची एक जागा कमी होऊन फक्त एकच जागा उरेल.

### आरक्षणात व्यापक बदलाची शक्यता

या तीन समित्यांमध्ये पुन्हा आरक्षण कार्यक्रम राबवावा लागण्याची शक्यता आहे. जरी इतर समित्यांसाठी पुनर्नियोजन आवश्यक नसले तरी संपूर्ण जिल्ह्याकरिता एकत्रित आरक्षण कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. 27 नोव्हेंबर रोजी रोटेशन आरक्षणावरील 74 याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. दोन्ही न्यायालयांच्या निर्णयामुळे जिल्ह्यातील अनेक गणांचे आरक्षण बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष आता 25 नोव्हेंबरच्या सर्वोच्च न्यायालयीन सुनावणीकडे आणि 27 नोव्हेंबरच्या उच्च न्यायालयीन सुनावणीकडे लागले आहे.

# काँग्रेस गडकोट राखणार की, भाजप मुसंडी मारणार!

## चिखलदरात नगर परिषदेत अटीतटीचा सामना

**वार्तापत्र**
मारोती पाटणकर,
चुरणी, ता. चिखलदरा.
भ्रमणध्वनी क्रमांक-
8888688352









सातपुड्याच्या पर्वतावर वसलेले नंदनवन, पर्यटन नगरी चिखलदरा विकसीत करण्याकरिता केंद्र व राज्य शासन आपआपल्या परिने नगर परिषदेच्या माध्यमातून अधिकचा निधी खर्ची घालत आहे. जिल्ह्यात सर्वाधिक उत्पन्न असलेली ही नगर परिषद निवडणूकीच्या माध्यमातून ताब्यात घेणे सर्व राजकीय पक्षाकरिता अत्यंत महत्वाचे झाले आहे. खुद्द राज्याचे शिरोमणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा हस्तक्षेप या चिखलदरा नगर परिषदेच्या निवडणूकीमध्ये आहे, हे नुकतेच पहायला मिळाले. असे असताना आता प्रशासक राजपुर्वी काँग्रेसच्या ताब्यात असलेली ही नगर परिषद पुन्हा काँग्रेसच्या ताब्यात येते की, भाजप मुसंडी मारुन पुन्हा ही नगर परिषद ताब्यात घेते हे पाहण्यासारखे राहील.

चिखलदरा नगर परिषद निवडणुकीचा ज्वर दिवसेंदिवस तापताना दिसत आहे, यामूळे स्थानिक पातळीवर राजकीय हालचालींना मोठा वेग आला आहे. भाजप आणि काँग्रेस हे दोन प्रमुख पक्ष थेट आमनेसामने आल्याचे स्पष्ट दिसत आहे. मुख्यमंत्र्यांच्या मामेभावाला अविरोध निवडूण आणल्यावर काँग्रेसने बचावाची भूमिका घेतली आहे. आपले उमेदवार सुरक्षित करुन त्यांच्यावर लक्ष ठेवले जात आहे. नगरपरिषदेवर सत्ता स्थापन करण्यासाठी दोन्ही पक्षांनी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका, मतदारांच्या भेटी, जनसंपर्क मोहिमा आणि शक्ती प्रदर्शन केले जात आहे. चिखलदरा येथे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून नगराध्यक्ष राहिलेले सुर्यवंशी यंदा भाजपकडून नगराध्यक्ष पदासाठी उभे असल्याने पारडे नेमके कुणाचे जड राहील हे पाहण्यासारखे आहे. चिखलदऱ्यामध्ये हिंदू, मुस्लिम, बौध्द आणि ख्रिश्चन धर्माचे मतदार कमी अधिक प्रमाणात आहेत. त्यामूळे नगराध्यक्ष पद किंवा सर्वाधिक नगरसेवक हे भाजपचेच राहतील याबाबतीत कुणीच पक्के सांगू शकत नाही. दुसरीकडे केंद्रापासून ते राज्यापर्यंत भाजपचे कमळ टवटवीत असल्याने काँग्रेसचे किती पारडे जड राहील हेसुध्दा स्पष्ट करता येणार नाही. मात्र काँग्रेस पारंपरिक मतदारांचा आधार टिकवून ठेवण्यावर भर दिला जात आहे, तर भाजपकडून नवीन मतदार, विशेषतः युवा वर्गाला जोडण्याची मोहीम राबवली जात आहे. गेल्या काही महिन्यांत दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी चिखलदरा परिसरात अनेकदा दौरे करून स्थानिक प्रश्नांची माहिती घेतली. त्यामुळे मतदारसंघातील वातावरण अधिकच रंगतदार झाले आहे.

चिखलदरा नगरपरिषद क्षेत्रातील पाणीपुरवठा, स्वच्छता, पर्यटन वाढ, रस्ते विकास, कचरा व्यवस्थापन अशा अनेक मुद्द्यांवर नागरिक मतदान करणार असल्याचे बोलत आहे. या निवडणुकीत नागरिकांचा विश्वास कोणत्या पक्षावर बसणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. दोन्ही पक्षांची संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत असून, दावेदारांची हलचाल वाढली आहे. पक्षांतर्गत गटबाजी थोपवून एकजूट निर्माण करण्यासाठी नेतृत्वाकडून प्रयत्न सुरू आहेत.

निवडणुकीच्या तोंडावर प्रचार योजनांना वेग आला असून मतदारांना आकर्षित करण्यासाठी सभा, भेटी, पदयात्रा, समाज माध्यमावर प्रचार यांसारख्या उपक्रमांची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे चिखलदरा नगर परिषद निवडणूक यावेळी चुरशीची, रोमांचक आणि लक्षवेधी ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. चिखलदरा नगरपालिका ही पारंपरिक काँग्रेसची गड मानली जाते. अनेक वर्षे काँग्रेसचे वर्चस्व येथे राहिले आहे. भाजप फक्त एकदाच सत्तेत आली असली तरी यावेळी पक्षाने मजबूत तयारीसह मैदानात उतरण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे काँग्रेस आपला गड राखणार की भाजप सत्ता हस्तगत करणार, यावर सर्वांचे लक्ष लागले आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

